**तक्रारदारातर्फे सा. क्र.२ ची शपथेवर पडताळणी**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – बाजीराव पांडुरंग गुरव.

**वय** – ४२ वर्ष, **व्यवसाय** – खाजगी नोकरी,

**राहणार**– इस्पूर्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर.

**तक्रारदारातर्फे पडताळणी – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**१.** या प्रकरणातील गै. क्र.२ माझी पहिली पत्नी असून तिचे माहेर कोरज, ता. चंदगड आहे. माझा गै. क्र.२ सोबत दि.२७.०४.२०१६ रोजी विवाह झाल्यानंतर ती ६ वर्षे माझ्यासोबत नांदली होती. माझा गै. क्र.२ पासून दि.१९.०७.२०२४ रोजी घटस्फोट झाला आहे. गै. क्र.२ डिसेंबर २०२२ मध्ये मला सोडून तिच्या माहेरी निघून गेली होती. ती माहेरी गेल्यानंतर माझा तिच्याशी संपर्क झाला नव्हता. त्यानंतर मध्यस्थांमार्फत आमचा संपर्क झाला होता. त्यावेळी ती माहेरी किंवा मावशीकडे राहते असे मला खोटे सांगत होती.

**२.** गै. क्र.२ ही माहेरी निघून गेल्यानंतर ती गै. क्र.१ सोबत पत्नी म्हणून आजरा येथे राहत होती. मला त्याबाबत माझ्या पाहुण्यांकडून गै. क्र.२ मला सोडून गेल्यानंतर पाच ते सहा महिन्यांनी समजले होते. गै. क्र.४ हा गै. क्र.२ चा वडिल आहे. तो माझा पुर्वीचा सासरा आहे. माझे व त्याचे पुर्वी देखील चांगले संबंध नव्हते. त्यामुळे मी गै. क्र.२ पासून घटस्फोट घ्यायचे ठरवले होते. गै. क्र.२ ने घटस्फोट घेण्यासाठी माझ्या मागे तगादा लावून माझ्यावरती दबाव टाकण्यासाठी डी. व्ही. ची केस केली होती.

**३.** गै. क्र.२ मला सोडून गेल्यानंतर फोनवरती तिच्यासाठी मावशीने सरकारी नोकरदार पाहिला आहे असे सांगत होती. मला माझ्या नातेवाईकांनी गै. क्र.२ ने गै. क्र.१ सोबत दुसरे लग्न केल्याची माहिती दिली होती. ते दोघे आज रोजी पती– पत्नी म्हणून आजरा येथे राहत आहेत.

**समक्ष,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०६.०४.२०२६.                प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.